# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**विधान भवन, नागपूर इमारतीतील स्थापित करण्यात आलेल्या ४ व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा (VC ऑडिओ-व्हिडीओ) (देखभाल-दुरुस्ती AMC) करिता या क्षेत्रातील उत्पादक/ पुरवठादार नियुक्त करणे संदर्भात...**

विधान भवन नागपूर येथे स्थापित करण्यात आलेल्या ४ व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा (VC ऑडिओ-व्हिडीओ) १ वर्षाच्या कालावधीकरिता देखभाल-दुरुस्तीसाठी (AMC) या क्षेत्रातील तज्ज्ञ पुरवठा/ ठेकेदार नियुक्त करण्यासाठी या क्षेत्रातील पुरवठादार/ ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. पुरवठादार/ ठेकेदार सदर यंत्रणेची देखभाल दुरूस्तीसाठी किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच संबंधितास कार्यालयात ४ व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा (VC ऑडिओ-व्हिडीओ) देखभाल दुरूस्तीचा शासकीय/निमशासकीय कार्यालय/ विधान भवनातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

४ व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा (VC ऑडिओ-व्हिडीओ) देखभाल-दुरुस्ती (AMC) दरपत्रक भरण्यापूर्वी कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, ग-२ शाखा, कक्ष क्रं.०१७ तळमजला, विधान भवन, मुंबई यांचेकडून या सचिवालयास आवश्यक असलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा (VC ऑडिओ-व्हिडीओ) देखभाल-दुरुस्ती (AMC) GST सह दर नमूद करुन दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-४,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**